नि.दि.दावा क्र. १२२६/२०२३
नसिमा व इतर वि. हुसून व इतर

**<u>निशाणी क्र. ४४ खालील आदेश</u>**
**( CNR NO. MHLA140036672023 )**

प्रस्तूत अर्ज हा प्रतिदाव्यातील वादीने दाव्यामध्ये निशाणी ४१ चा मंजूर झालेल्या अर्ज, तृतीय पक्षकार समाविष्ट करणेस झालेला विलंब माफ करुन प्रतिदावा दुरुस्ती करणेसाठी परवानगी मागणेकरिता केलेला आहे. युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिदाव्यातील वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात तृतीय पक्षकार समाविष्ट करणेसाठी दिलेला अर्ज दिनांक ११.११.२०२४ रोजी मंजूर झाला होता. परंतू सदर दुरुस्ती मुदतीत करणेकामी वादीस विलंब झाला आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिदाव्यातील प्रतिवादीने त्याचे म्हणणे दाखल केले नाही. सबब अर्ज विनाम्हणणे चालविण्यात आला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिदाव्यातील वादीने वादपत्रामध्ये तृतीय पक्षकार यांना दाव्यात समाविष्ट करण्यासाठीचा अर्ज यापुर्वीच मंजूर झालेला आहे. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज **<u>नि.क्र.४४</u>** मंजूर करण्यात येतो.

२. वादीस दाव्यात निशाणी ४१ प्रमाणे दुरुस्ती करणेची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.01.29 17:46:14 +0530

औसा. (श्री. आवटे पी. पी.)
दिनांकः– २९/०१/२०२५ सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर., औसा.